# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

# 'पीएमपीएमएल' च्या प्रवासी संख्येत गतवर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ

➢ **प्रवासी संख्या वाढल्याने उत्पन्नातही वाढ.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाची सेवा पुणेकरांच्या पसंतीस उतरली असून महामंडळाच्या **प्रवासी संख्येत व दैनंदिन उत्पन्नात लक्षणीय वाढ** झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बस सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह** यांनी पदभार स्वीकारल्या पासून महामंडळाच्या सक्षमीकरणासह दैनंदिन प्रवासी संख्या व उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली आहे.

सन २०२२ व सन २०२३ च्या माहे जुलै व माहे ऑगस्ट मधील प्रवासी व उत्पन्नाची आकडेवारी खालीलप्रमाणे.

| अ.क्र | महिना | सन २०२२ | | सन २०२३ | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रवासी संख्या | उत्पन्न रुपये | प्रवासी संख्या | उत्पन्न रुपये |
| १. | जुलै | ३,१७,०१,०६५ | ४२,८८,३१,८८५ | ३,५६,४२,९६३ | ५२,६१,२३,६८० |
| २. | ऑगस्ट | ३,४५,२७,३०४ | ४७,०४,८९,९४९ | ४,००,७०,६६२ | ५७,०८,६९,१३३ |

जास्तीत-जास्त प्रवाशी नागरिकांनी पीएमपीएमएलच्या बससेवेचा वापर करावा, असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. कडून करण्यात येत आहे.

sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

दि. ०१/०९/२०२३.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...
महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.